महाराष्ट्र टाइम्स

छ. शिवाजी महाराज जयंती.

लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, इनोव्हेशन व इनक्युबेशन कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, उपस्थित होते.

**( विवेकानंद कॉलेज )**

येथील विवेकानंद कॉलेजमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. याप्रसंगी प्रिया बुराण यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी सी. बी. दोडमणी, रवी चौगुले उपस्थित होते. डॉ. एस. आर. कटीमनी यांनी आभार मानले.

**न्यू हायस्कूल**

न्यू हायस्कूल पेटाळा प्रशालेत शिवजयंती साजरी करण्यात आली. पर्यवेक्षक डी. के. गुरव यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी गुरव यांनी शिवाजी महाराजांच्या विविध पत्रांचा संदर्भ देत त्यांच्या कारभाराची माहिती दिली. याप्रसंगी सयाजीराव पाटील, जिमखाना प्रमुख एच. बी. खानविलकर, वाय. एस. पोवार, डी. आय. गुजर, पी. बी. पाटील, एस. एस. घाटगे उपस्थित होते.

**जय भारत हायस्कूल**

जय भारत हायस्कूल, डॉ. श्रीधर सावंत विद्यामंदिर, सरस्वती सावंत बालमंदिर येथे शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. पी. एस. जाधव यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी पहिली ते दहावीच्या २५ विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बी. एल. पाटील यांनी संग्रहित केलेल्या गडकिल्ल्यांच्या चित्रांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. अश्विनी पाटील, ए. के. भोसले, एस. एम. पाटील, शितल काळे आदी उपस्थित होते.